दिपावली विशेषांक

# स्नेहबंध

नोव्हेंबर ५, १९९१ संपादक - नंदकुमार ठकार





**REAL ESTATE SERVICE**

Residential, Commercial Industrial lands buying, selling, leasing and syndication.

**MORTGAGE FINANCING**

1st, 2nd, and 3rd mortgage despite income or Credit up to 90%. 100 % financing available to qualified investor/applicant.

**INVESTMENT SERVICES**

Invest in mortgages and receive 15-28% return per annum.

For the first time qualified buyers we will arrange Down-Payment and welcome equity participation. For Further Information Call,

**JAY THAKUR, Broker**

(416) 455-1641 (24hrs)

**Jayson's R.E. LTD.**

522, RAY LAWSON BLVD., BRAMPTON

# अनुक्रमणिका : स्नेहबंध - वर्ष-२१वे.


| | विषय | लेखक | पान क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | कार्यकारिणी मंडळ | — | २ |
| २ | संपादकीय / अध्यक्षीय | — | ३ |
| ३ | आली दिवाळी (कविता) | श्री. जयवंत कोरगांवकर. | ४ |
| ४ | दिवाळी (कविता) | सौ. गीता ठाकूर. | ४ |
| ५ | वृत्तसार | श्री. नंदकुमार ठकार. | ५ |
| ६ | स्मृतींची चाळता पाने | सौ. दुर्गा पाच्छापूरकर. | ६-७. |
| ७ | मंडळाचा चॅरिटेबल दर्जा | श्री. काशीनाथ घाणेकर. | ८ |
| ८ | दिवाळी शुभेच्छा (कविता) | श्री. मधुसुदन भिडे. | ९ |
| ९ | दिपावली (कविता) | सौ अर्चना बापट. | ९ |
| १० | मंडळाचे मानपत्र | श्री. काशिनाथ घाणेकर. | १० |
| ११ | टोरांटोत मराठी पुस्तकांची वाटचाल | श्री. गंगाधर देशपांडे. | ११ |
| १२ | मी व सर जॉन ए मॅकडोनाल्ड | श्री. अजित कुकडे. | १२-१३ |
| १३ | सुमंगल समधी (कविता) | सौ. सिंधुताई पारखी. | १३ |
| १४ | असावे घरटे अपुले छान | श्री. नंदकुमार ठकार. | १४-१५ |
| १५ | माझी माती (कविता) | श्री. नंदकुमार ठकार. | १५ |
| १६ | मंडळाचे हिशोब १९९० | — | १६-१७ |
| १७ | जुन्या आठवणी (पहिला स्नेहबंध) | श्री. गंगाधर देशपांडे (संग्राहक) | १८ |
| १८ | वृत्तसार | श्री. नंदकुमार ठकार. | १९-२४ |
| १९ | मराठी आडनावांची गंमत | सौ. सुधा सेडकर. | २४. |


मुखपृष्ठावरील फोटो - सौ. स्मिता ठकार.

मलपृष्ठावरील फोटो - श्री. नंदकुमार ठकार, सौ. स्मिता ठकार, कु. अनिता कंदळगांवकर कु. ऋषिकेश ठकार.

मुखपृष्ठ सजावट - श्री. राजन मुरकुटे. मलपृष्ठ सजावट : श्री. नंदकुमार ठकार.

हस्ताक्षर - श्री. नंदकुमार ठकार, श्री. राजन मुरकुटे व स्वत: लेखक.

अंतर्गत सजावट - कुमार सौरभ ठकार, श्री. नंदकुमार ठकार, चि. ऋषिकेश ठकार.

टीप : या वर्षीच्या स्नेहबंधच्या पहिल्या ३ अंकांवर वर्ष २० वे असे टाकले होते १९७१ च्या पहिला अंकाची प्रत या अंकात छापली आहे. त्यास अनुसरून हे वर्ष २१ वे होते. ती दुरुस्ती या अंकापासून करण्यात आली आहे. अंकात छापलेल्या सर्व मजकुराशी संपादक सहमत आहेतच असे नाही.

## MARATHI BHASHIK MANADAL,TORONTO INC.-EXECUTIVE COMMITTEE 1991

1. HEMANT KANDALGAONKAR
   PRESIDENT
   24,MARBURY PLACE
   BRAMPTON,ONTARIO
   L6S 3A9
   (416)793-7965

2. LAXMIKANT THAKAR
   EDITOR,"SNEHBANDH"
   29,CARTER DR.
   BRAMPTON,ONTARIO
   L6V 3N4
   (416)452-1992

3. SUVARNA KULKARNI
   TREASURER
   (416)261-2178

4. SHASHI NIMKAR
   SECRETARY
   (416)433-8634

5. AJIT KUKADE
   PRESIDENT EX-OFFICO
   (416)724-1608

6. SANGITA KUKADE
   PRESIDENT YOUTH REP.
   (416)724-1068

7. NITIN AYACHIT
   (416)261-5453

8. MUNAWAR MERCHANT
   (416)822-3384

9. KUMAR TELANG
   (416)450-1745

10. JAYANT THAKUR
    (416)450-1740

11. KRISHNAKANT MORO
    (416)291-2794

## ADVISORY COMMITTEE

1. BAL JOSHI
   CHAIRPERSON
   (416)495-7526
2. VASANT JUNNARKAR
   (416)822-4176
3. DURGA PACHAPURKAR
   (416)445-3935

ANNAPURNA- MRS.LILATAI TEMBE
MBM,TORONTO INC. AUDITOR- MR.DILIP PATKI

## संपादकीय :-

स्नेहबंधच्या सर्व वाचक मित्रमैत्रिणींना दिवाळीच्या निमित्ताने हा विशेषांक देताना आनंद होत आहे. गेले तीन-चार महीने हा अंक कसा असावा या बद्दल तर्कवितर्क होत होते. सर्व सभासदांना लिखाण पाठविण्याचे आवाहन केले होते. त्याला म्हणावा तसा प्रतिसाद मिळाला नाही. प्रयत्न केल्यास आपण सर्वजण मिळून एक दर्जेदार मासिक काढू शकतो म्हणून हा विशेषांक काढण्याचा मी अट्टाहास केला आणि कार्यकारी मंडळाने तो उचलून धरला.

या अंकाबरोबर १९९१ सालच्या स्नेहबंधच्या संपादक या नात्याने माझी जबाबदारी संपत आहे. यावर्षीचे चार अंक काढण्यासाठी लिखाण तपासण्यापासून अंक सभासदांचे हातात पडे पर्यंत बऱ्याच सभासदांची मदत झाली. त्यातील विशेष उल्लेख करण्यासारखे, लेखन तपासणी सौ. मीना घाणेकर, छपाई करणारे श्री. सतीष कुलकर्णी. अंकाचा आर्थिकभार हलका करायचा म्हणजे जाहिरात देणाऱ्यांची मदत हवीच. त्यात पुढाकार घेणारे श्री. किरण कुलकर्णी, श्री जयंत ठाकूर, श्री. वसंत पाध्ये-पूरकर, श्री. अजित कुकडे इ०

अंक पाकिटात टाकणे, पाकिट चिकटवणे, पत्ता चिकटवणे या कामात कार्यकारी मंडळाच्या उत्साही कार्यकर्त्यांबरोबर विशेष उल्लेख करावासा वाटतो तो म्हणजे कुमार सौरभ आणि ऋषिकेश ठकार या जोडीचा. सर्व उल्लेख केलेल्या आणि उल्लेख करावयाचा राहून गेलेल्या सर्व मदत करणारांना धन्यवाद!

१९९१ सालची ही दिवाळी सर्वांना

**"सुखासमृद्धीची, भरभराटीची जावो"**,

अशी प्रार्थना करून आपली रजा घेतो.

नंदकुमार ठकार

## अध्यक्षीय :-

सर्व कार्यकारिणी आणि सभासद बंधु-भगिनींच्या कुटुंबियांना ही दिवाळी व नूतनवर्ष

**"सुखाचे, समाधानाचे आणि भरभराटीचे जावो"**

अशी प्रार्थना.!

गेले वर्ष हे आर्थिक व मानसिकदृष्टीने थोडे अवघड गेले. दिवाळीच्या या शुभनिमित्ताने ही परिस्थिती बदलेल व तरुणांना, विद्यार्थीवर्गाला व त्यांच्या सर्व पालक वर्गाला एका नवीन पर्वाची सुरवात करून देता येईल.

बदलत्या काळानुसार आपल्या मंडळाने खूपच प्रगति केली आहे. एक काळ असा होता की स्नेहबंध एकपानी मुखपत्र होते. या शहरात मराठी भाषा बोलणारांची संख्यापण जेमतेम मूठभर होती.

हळूहळू परिस्थितीत बदल होत जावून "मराठी भाषिक मंडळ" ही एक दखल घेण्याजोगी संघटना बनली आहे. संघटनेच्या एकजुटीचे प्रतिक म्हणून मराठी शाळा, युवासंघ व वर्षभर होणारे कार्यक्रम याचे देता येईल. संगीत, नृत्य, कला, साहित्य आदींचे रसिक म्हणून मराठी माणसाचा कौतुकाने उल्लेख केला जातो. त्याला साजेशी कामगिरी मराठी भाषिक मंडळाने आजपर्यंत केली आहे. आता लोकांच्या नेमक्या गरजांवर पद्धतशीरपणे लक्ष केंद्रीत करण्याची वेळ येवून ठेपली आहे.

मंडळाच्या सभासदांना मार्गदर्शन करून संघटीतपणा निर्माण केल्याबद्दल सर्व माजी अध्यक्ष, कार्यकारिणी सभासद व इतर या सर्वांचे मी अभिनंदन करतो.

१९९३ साली मंडळाच्या रौप्यमहोत्सव साजरा होत आहे, त्या निमित्ताने सर्वांनी असेच संघटीत राहून कार्य करावे व मराठी माणसाच्या, भाषेच्या गौरव करावा!

हेमंत कंठाळगांवकर

## आली दिवाळी

भादवा सरला आली दिवाळी
हासत नाचत आनंदे आली
भल्या पहाटे उटणे लावुनी
स्नान करूया सुगंधी जळानी

नटुनी ललना प्रसन्न वदनी
खुलविती रांगोळ्या आपुल्या सदनी
दिव्यांची तोरणे स्वागता लटकती
झगमग पाहुनी आनंदाची भरती

आकाशकंदील जणु वैभव सणाचे
विलसते ते एक प्रतीक मांगल्याचे
अहा, कशी तळपते ज्योत पणतीची
सांगे जणु रीत संयम शांततेची

ओवाळिली पतींना सुहास्ये सुहासिनी
येता पाडवा, हाती दीप धरोनी
पूज्य देवता श्रीलक्ष्मी माता
आशिर्वाद देई धनपूजन करीता

आली भाऊबीज बहीण ओवाळी
मायेचे कुंकू लावी भावाच्या कपाळी
पाहुणी दिवाळी पांच दिसांची
नका दाखवू उणीव कशाची

श्री जयवंत कोरगांवकर

## दिवाळी

दिवाळी आली
कामाला सुट्टी
मित्र मैत्रिणींची
झाली गट्टी

फिरण्या वाचनाची
मिळाली संधी
खाण्या पिण्याची
नाही बंदी

रोजच्या कपड्यांना
दिली रजा
नवे नवे कपडे
खूपच मजा

रंगीत रांगोळी
सुरेख छान
आकाशी दिवा
सुंदर विमान

दिवाळी आहे
सणांचा राजा
छोट्या मोठ्यांची
मजाच मजा

सौ. गीता ठाकूर

मुलगा : मास्तर मीं वर्गात बसत नाही आज!
शिक्षक : कां?
मुलगा : मला बर नाही वाटत.
शिक्षक : पण कुठे, काय होतय?
मुलगा : शाळेत लक्ष नाही लागत!

नंदकुमार ठकार.

"पहाटे दव का पडते?" या प्रश्नाला रामूने उत्तर लिहीले, "देवाला ठाऊक!"
उत्तरपत्रिका तपासून आल्या. त्यात शिक्षकांनी लिहीले होते, 'देवाला पैकीच्या पैकी मार्क! तुला उरलेले शून्य!!'

नंदकुमार ठकार.

# वृत्तसार

## वार्षिक सहल :

20 जुलै १९९९ रोजी मेघराजांच्या अनुपस्थितीत मंडळाची वार्षिक सहल ठरलेल्या ठिकाणी व्यवस्थित पार पडली. मंडळाचे उत्साही कार्यकर्ते सोडल्यास सर्व सभासद येण्यास सकाळी १०-चे ऐवजी दुपारचे २/२॥ वाजले तरीही चेंडू-फळीचा सामना होवून तो कावळे इलेव्हनने जिंकला. कडक उन्हाच्या चटका आणि थकवा घालविण्यासाठी बऱ्याच सभासदांनी जलतरण केले. नंतर सौ. प्रविणा काळे आणि साथीदार भगिनींनी केलेल्या चटकदार भेळीबरोबर, भाजलेले कणीस आणि कलींगड खाता खाता दिवस कसा काय संपला ते कळले सुध्दा नाही!

## युवा-शिबीर :

१६ ते १८ ऑगस्ट दरम्यान ठरल्याप्रमाणे ४० युवक/युवतींचे शिबीर अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणांत पार पडले. युवकांनीच ठरविलेल्या सर्व कार्यक्रमांप्रमाणे, मेघराजांच्या उपस्थितीत सुध्दा शिबीराला कोठेही गालबोट लागले नाही.

सर्वश्री श्री. नंदकुमार ठकार, श्री. राजन मुरकुटे, श्री. कुमार तेलंग या त्रयींनी संघटक म्हणून शिबीर यशस्वी होण्यासाठी विशेष प्रयत्न केले.

श्रीखंड-पुरी-ची मेजवानी होवून शिबीराचा समारोप झाला.



## गणपती बाप्पा मोरया ऽ ऽ ऽ.

२१ सप्टेंबर १९९९ रोजी बरोबर दुपारी १२॥ वाजता श्रींच्या मूर्तीची मिरवणूक काढून मग प्रतिष्ठापनेच्या पूजेस सुरवात झाली. पूजा होईपर्यंत सर्व सभासद जमा झाले. आरती व मंत्रपुष्पांजली होवून सर्व सभासदांना श्रींचा प्रसाद वाटण्यात आला.

२ चे ऐवजी २॥ वाजता आनंदबाजार सुरु झाला. आनंदबाजारातील निरनिराळ्या पदार्थांची चव घेता घेता ४/४॥ वाजले आणि बाळ-गोपाळांनी बसविलेल्या विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम सुरु झाला. तब्बल तीन तास चाललेल्या या कार्यक्रमात बऱ्याच कलाकारांनी आपल्यातील सुप्त कला सादर केली.

७॥/८ वाजता श्रींची सायंआरती होवून विसर्जन मिरवणुकीने कार्यक्रमाची सांगता झाली.

कार्यक्रम यशस्वी होण्यास खालील लोकांची विशेष मदत झाली.

पौरोहित्य : श्री. विश्वनाथ कुलकर्णी.
पूजा दांपत्य : श्री. व सौ. नरेंद्र दातार.
कार्यक्रम : सौ. सुवर्णा कुलकर्णी.
कु. संगीता कुकडे.
श्रींचा प्रसाद : सौ. लता जोशी / कुलकर्णी
वाद्य साथ : श्री. केशव गोडसे व साथीदार.
प्रदर्शन : श्री. शशी करंदीकर व साथीदार.
शिवाय आनंद बाजारात भाग घेणारे सर्व.

# स्मृतींची चाळता पाने --

सौ. दुर्गा पाच्छापूरकर.

नुकतीच आमच्या बाल्कनीत उभी राहून समोरच्या निसर्गाचा 'रंगोत्सव' डोळे भरून पहात होते. 'पर्णोत्सवचं तो! लालचुटुक पासून ते फिक्या पिवळ्या रंगापर्यंतच्या मधल्या सगळ्या छटा दिमाखानं मिरवीत नटलेली ती झाडं.. खाली पडलेल्या सोनेरी वाळक्या पानांनी तळाच्या हिरण्यागार अशा मखमाली गवतावर घातलेली रांगोळी.. हे सारं पाहतांना मनाला आनंदाबरोबरच हुरहुरही लागली होती. कारण आता डोळ्यासमोर दिसत होत्या आगामी प्रदीर्घ रात्री आणि पटकन संपलेले दिवस.. हिमवर्षाव .. झोंबणारे गार वारे.. चावरी थंडी.. गोठलेला पाऊस! पण ती आठवण निग्रहाने बाजूला सारून मनाशी म्हटलं, "आत्ता ह्या क्षणी समोरच्या सोहोळ्याला बघून तर घ्यावं! पुढचं पुढे!"

हा दरवर्षी न चुकता चालणारा खेळ आहे. माझी फ्लॉरिडातली एक जिवाभावाची मैत्रीण कधी भेटली किंवा फोनवर बोलली की म्हणते, "कसं गं बाई तुम्हाला टोरांटोला रहायला आवडतं? तुमच्याकडची ती थंडी, ते वादळवारे, तो स्नो..! सगळा विचार केल्यावर वाटतं की, आमचं फ्लॉरिडाच बरं आहे हो!" ह्यावर मी नेहमीच तिला आवेशानं ऋतुबदल होतांना अनुभवास येणारी मजा समजावून सांगते. माझा मुद्दा असा असतो की, "बाई गं! जेव्हा घसरडे रस्ते, निसरडे पादचारीमार्ग, वादळी हवा, भयाण थंडी ह्या सगळ्याला सुमारे (फक्त) दोन महिने तोंड दिल्यावर जेव्हा मार्च महिना उजाडतो तेव्हा आम्हाला आसुसून मग 'वसंता'गमनाचे जे वेध लागतात त्याच्या तुलनात्मक असं तुमच्याकडे काय आहे?.. जुलै-ऑगस्टच्या सुट्ट्या, उकडहंडी आणि पाहुण्यांच्या वर्दळीनंतर सप्टेंबरात मुलांच्या शाळा अन् कॉलेजं सुरू होतात तेव्हा इथे आम्हाला 'पर्णोत्सवाच्या दिवसांचे.. तेव्हाच्या त्या सुखद थंडीचे.. निळ्याभोर आकाशाचे जे वेध लागतात त्याची तुलना तुमच्याकडे कशानं होऊ शकेल? कसला मेला तो सारखा उकाडा!"

शेवटी माझ्या असं लक्षात आलं आहे की आपलं घर ते आपलं घर! एकदा तुम्ही कुठल्याही देशाला, प्रांताला, गावाला 'आपलं' म्हटलं की मग त्याला तुम्ही बांधले जाता. दोषांकडे काणाडोळा करून गुणांची बेरीज करायला सुरवात होते.. आणि मग त्या बेरीज-वजाबाकीत, 'आपला गणीत हा विषय कधीच पक्का नव्हता' हा साक्षात्कार होतो! .. हा 'आपलं म्हटलं की चांगलं' हा मुद्दा नुसत्या घरा-गावालाच नाही तर सगळीकडेच लागू पडतो.

आता ह्या टोरांटोचंच बघा ना! माझ्यापेक्षा वयानं मोठी अशी इथे अनेकजणं आहेत. पण माझं टोरांटोमधलं एकूण वास्तव्य मला बरीच 'सिनिऑरिटी' देऊन जातं! १९६० साली लग्न झाल्यावर १९६१ च्या जानेवारी महिन्याच्या मध्यावर मी इथे आले. आधी न्यूयॉर्कसारख्या अफाट शहरात २-३ महिने घालवून मी इथे आल्यामुळे अगदी मुंबईहून पुण्याला आल्यासारखीच ती अवस्था होती (अर्थात मी मुळात मुंबई बाहेरची असल्याने मला मुंबईच्या त्या घामट गर्दीची, वाघ मागे लागल्यासारख्या धावपळीची आणि एकूणच आवाजाच्या दुनियेची नफरत आहे हे नमूद करावसं वाटतं!).. त्यात तो इथल्या 'कनेडियन' थंडीचा ऐन मध्य... झाडांचे खराटे झालेले... रस्त्यावर पडून गेलेल्या स्नोवर गाड्यांच्या धुरामुळे अन् चिखलामुळे चढलेला तो (आता चिरपरिचित) रापट काळसर रंग.. जीव गोठवून टाकणारी थंडी.. आणि ह्या सगळ्यावर ताण म्हणजे एक नवरा सोडला तर मराठी भाषा येणारं एकुलतं एक तांबोळी आडनावाचं कुटुंब सोडल्यास कोणीही मराठी म्हणून नाही! मराठीच कशाला? एकूणच भारतीय माणसं ही अभावानंच दिसायची... साधा आपला रोजचा स्वयंपाक करायचा असं ठरवलं तरी एक धडभलं भारतीय किराणामालाचं दुकानसुद्धा नव्हतं ह्या टोरांटोत!

तेव्हाच्या टोरांटो शहराचं रूपही काय होतं म्हणून सांगू!... सध्याच्या सुप्रसिद्ध (की कुप्रसिद्ध?) 'डॉन व्हॅली पार्कवे ऊर्फ पार्किंग लॉट' बांधायला जेमतेम सुरवात

झालेली होती.. टोरांटोच्या माथ्यावर लांब-रुंद पसरलेला 'फोर ओ वन' फक्त चार लेन्सचा होता!.. साधारणतः 'फोर ओ वन'च्या उत्तरेला माळरान वा शेती होती.. टोरांटोच्या सुप्रसिद्ध टी.टी.सी.ची तिकिटं मिळायची एका डॉलरला सात!.. आणि सबवे पूर्व-पश्चिम नव्हतीच. फक्त उत्तर-दक्षिण एकच लाईन आणि तीही फक्त युनियन स्टेशनवरून निघायची आणि समाप्त व्हायची एग्लिंटन स्टेशनवर!.. टोरांटोतली उंचात उंच इमारत होती अवघी २२ मजली!.. तेव्हा 'मेपल लीफ्स' ही आईस हॉकी टीम अगदी फॉर्मात होती आणि 'ब्लू जे' हे एका पक्षाचं नाव म्हणून फक्त निसर्गप्रेमी लोकांना माहीत होतं!

माझ्यानंतर ७-८ महिन्यातच टेंबे कुटुंबाचं इथे आगमन झालं आणि मराठी बोलणाऱ्यांची संख्या चक्क दुप्पट झाली!.. हळू-हळू एक दोन वर्षात टोरांटो आणि आसमंतात 'कोलंबो प्लॅन'वर आलेले प्रौढ मराठी विद्यार्थी आणि हाताच्या बोटांवर मोजण्याइतकी मराठी कुटुंबं मिळून संख्या जरा बरी झाली.. तेव्हा साध्यासाध्या गोष्टींमधून कशी अपूर्वाई वाटायची! इथलं आमचं जीवन कसं 'आंतरराष्ट्रीय' होतं ह्याचं एक मजेदार उदाहरण द्यायचं तर, जॉनी लोंबार्डीच्या (इटालियन) दुकानातून मिळवलेलं चिक पी फ्लॉवर ऊर्फ बेसनाचे काहीसे कडवट पीठ, चायना टाऊनमध्येच मिळणारा जरा लांब दाण्याचा तांदूळ व कोयिंबीर, इथल्याच सुपर मार्केटात मिळणारं तेल-मीठ आणि लेक ऑंटेरिओ मधलं घराघरातून वाहणाऱ्या नळाचं पाणी वगैरेचा संयोग करून एखाद्या सायंकाळी पिठलं-भाताचा बेत जमवून आणला की काही तास भारतातच असल्याचा भास व्हायचा.. आणि भरीला वातावरणनिर्मिती करण्यासाठी तेव्हाच्या त्या फॅशनेबल 'रील टु रील' भल्या अवजड टेपरेकॉर्डरवर घरून आणलेल्या मराठी गाण्यांच्या टेप्स वाजत असायच्या!

अशाच एका पिठलं-भाताच्या मेजवानीच्या दिवशी कुणाच्या तरी डोक्यांत, "आपण आता 'ग्रुप' म्हणवण्याइतपत मराठी लोक आहोत तर निदान एकत्र दिवाळी साजरी करण्याची आयडिया कशी वाटते?" ह्या सुपीक कल्पनेचा उगम झाला... मग काय विचारता? सगळ्यांच्या उत्साहाला नुसतं उधाण आलं!.. इतर भारतीय मित्रमंडळींच्या काहीशा नाराज विरोधाला डावलून फेअरलॉन चर्चचे बेसमेंट मिळवणे.. फराळाचा मेन्यू आखणे.. तमाम मराठी जनांना ही मस्त बातमी कळवून एकेक पदार्थ करायचे काम मागे लावणे अशा लगीनघाईत लागलो!.. १९६३ सालच्या नोव्हेंबर महिन्यातल्या एका शनिवारी दीपावलीनिमित्त आम्ही झाडून सगळी मराठी मंडळी जमलो अन् काय धन्यता वाटली म्हणून सांगू? त्या भल्याथोरल्या, ऐसपैस बेसमेंट हॉलमध्ये अगदी तान्ह्यापासून तो मोठ्यापर्यंत जेमतेम ५०-५५ डोकी असतील. कुठे कोपऱ्यात मावली असती. पण त्या ५०-५५ मुखांमधून आनंदाने जी बडबड.. मुलांची धावपळ चालली होती त्यांनी सारं सभागृह भरून गेल्यासारखं वाटलं. तिथल्या स्टेजवर तमाम सगळ्यांना बसवून एक ग्रुप फोटोचा कार्यक्रम झाला.. तो फोटो आजही माझ्या संग्रही आहे. तो बघितला की, तेव्हाच्या सुखद स्मृतींचं एक काहूर मनात उठतं! आत्ताच्या 'मराठी भाषिक मंडळाची' ती अनौपचारिक सुरवात होती असं म्हणायला हरकत नाही.

मग पुढे २-३ वर्षात सहल, गणेशोत्सव अशी भर पडत गेली.. त्या अनौपचारिक छोट्या समुहाची वाढ होत जाऊन मग मंडळ, त्याची घटना, त्याचे पदाधिकारी वगैरे तपशील अपरिहार्यपणे आला आणि तो तसा व्हायला हवाही होता. कारण संख्या वाढीबरोबर गरजाही वाढत होत्या.. नवनव्या कल्पनांनी 'मंडळ' समृद्ध बनत चाललं!

लवकरच 'आपल्या मंडळा'ला अधिकृतरीत्या २५ वर्षे पूर्ण होतील.. आपण सारेजण त्या 'रौप्यमहोत्सवात' उत्साहाने सामील होऊ.. मागील पंचवीस वर्षांचा आढावा घेऊ.. आपली पाठ थोपटून घेऊ! आणि पाठ थोपटून घेण्यासारखं कर्तृत्व आपल्या मंडळाने नक्कीच गाजवलं आहे. ह्याचं एकच उदाहरण द्यायचं तर १९८५ साली जुलै महिन्यात टोरांटोत 'बृहन्महाराष्ट्र मंडळाचं' दुसरं अधिवेशन झालं. त्याचा उल्लेख आजही 'संघटित कार्याचा आदर्श नमुना' अशा गौरवपूर्ण शब्दात उत्तर अमेरिकाभर केला जातो...

१९६३ साली मुठभर मराठी लोकांनी दिवाळीनिमित्त एकत्र जमून तिथे जो छोटासा दीपोत्सव केला तेव्हाच्या तेवणाऱ्या मंद ज्योतींच्या प्रकाशातले ते हसरे चेहरे.. त्यावरची धन्यधन्यता आठवून वाटतंय की, अरे! केवढी वाटचाल झाली आपली!

तेव्हा काय मंडळी? 'आपलं ते चांगलं' ह्या माझ्या म्हणण्याचा प्रत्यय आला की नाही?!

# मंडळाचा 'चॅरिटेबल' दर्जा

एखादी 'चॅरिटेबल' संस्था म्हटली की भारतातली 'अनाथ विद्यार्थी गृह' ही संस्था किंवा येथील 'United Way' डोळ्यासमोर येतात. या दोन्ही संस्था अर्थात पैसे उभारतात (तुमच्या आमच्या देणग्यांद्वारे) व मग ते पैसे आपापल्या संस्थेंच्या उद्दिष्टांवर खर्च करतात. कांहींची अशी समजूत आहे की 'चॅरिटेबल' संस्था म्हटली की अशा संस्थांनी गरजू लोकांना-गोरगरिबांना इ. - मदत करायची हे त्यांचे मुख्य कार्य!

या संदर्भात 'मराठी मंडळ ही एक चॅरिटेबल संस्था आहे' म्हणजे काय असा एक प्रश्न बरेचदां विचारला जातो.

मराठी भाषिक मंडळाला 'चॅरिटेबल' म्हणून मान्यता मिळाली १९८९ सालापासून. त्याचा अर्थ हा की सरकारने मानलेल्या 'charitable' शब्दाच्या व्याख्येत मंडळाच्या घटनेतील उद्दिष्टे पूर्णत: बसतात. मंडळाची घटनेत सहा उद्दिष्टे आहेत. त्यांचा सारांश असा-

१. धार्मिक स्वरुपाचे शिक्षण देणे.
२. मराठी भाषा शिक्षण देणे.
३. मराठी साहित्य, संगीत, नृत्य, नाटक अशा ललितकलांची माहिती आणि शिक्षण देणे.
४. गरजू लोकांना / Seniors ना मदत करणे.
५. वास्तू इतर स्थावरजंगम इस्टेट जमवणे (उद्दिष्टे १ ते ४ साधण्यासाठी).
६. वरील ५ उद्दिष्टांसाठी अवश्य ती कार्ये करणे.

आता मराठी मंडळाचा charitable संस्था म्हणून मूळ उद्देश इतर संस्थांसारखाच! वेगवेगळ्या रितीने पैसे उभारायचे व मग ते संस्थेची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी खर्च करायचे! आपल्या उद्दिष्टांकडे पाहून असे लक्षांत येईल की आपली उद्दिष्टे फार विस्तृत स्वरुपाची आहेत. उदा. गरजू लोकांना मदत करणे हे आपल्या कार्याचे एक छोटे अंग आहे. कारण त्यारेवरीज आपण इतर अंगांवरही बराच भर देतो!

आपले मंडळ पैसे जमा करते ते दोन रित्या—
अ) वैयक्तिक देणगीदारांच्या देणगीतून.
ब) कार्यक्रमांच्या वेळेस फी आकारली जाते त्यांतून.

कोणत्याही कार्यक्रमाच्या स्वरुपावरून कोणत्या उद्दिष्टासाठी हा पैसा जमा व खर्च होतो आहे त्याची आधी आंखणी होते. मग त्यातून पैसे शिल्लक राहिल्यास त्यांना दुसऱ्या एखाद्या उद्दिष्टासाठी राखून ठेवले जाते. उदा. एखादा गाण्याचा कार्यक्रम ठरला (उद्दिष्ट ३ प्रमाणे) व खर्च वजा जाता कांहीं पैसे शिल्लक उरले तर ते उद्दिष्ट २ किंवा ५ साठी ठेवायचे इ. या शिल्लक रकमेवर Revenue Canada, institutional Income Tax लावत नाही (charitable संस्था असल्यामुळे). दरवर्षी जमेचे Fixed % या उद्दिष्टांवर खर्च व्हायलाच हवे. झाले नाही तर ते पुढल्या वर्षासाठी वेगळे राखून ठेवायचे असल्यास त्यास सरकारची खास परवानगी घ्यावी लागते. उदा. वास्तू (उद्दिष्ट ५) साठी.

2 गोष्टी येथे मांडाव्याशा वाटतात:

गेल्या कांहीं वर्षांत Donor Membership आपण सुरु केली. $१०० कौटुंबिक व $५० वैयक्तिक. त्याच्या अनुक्रमे $६० व $४२ ची करमुक्तीची पावती दिली जाते. याचा फायदा फक्त ५० ते ६० लोक घेत आहेत. यात मंडळाचा व सभासदांचा दोघांचाही फायदा आहे. मंडळाजवळ रोख शिल्लक असते व त्यामुळे Program planning ला मदत होते. तर वैयक्तिक फायदा म्हणजे करमुक्तीचा व 'belonging' चाही एक आनंद आपल्यापाशी असतो. मंडळाच्या 'चॅरिटेबल' दर्जामुळे हे शक्य झाले आहे. तेव्हां त्याचा फायदा पुष्कळांनी घ्यायला हवा!

दुसरी गोष्ट ही की मंडळाच्या ५ व्या उद्दिष्टाकडे होणाऱ्या वाटचालीसाठी 'charitable' दर्जाचा फायदा पाहिजे तसा अजून तरी आपण घेत नाही आहो! $२५० पर्यंत साधारण २६% व $२५० च्या वर ४२% करमुक्ती तुम्हाला मिळू शकते. उदा. $१२५० देणगीवर पहिल्या $२५० वर (@ २६%) $६५ व पुढल्या $१००० वर (@ ४२%) $४२० असे $४८५ ची करमुक्ती तुम्हाला मिळू शकते.

मंडळाची वास्तू हवी आहे असे सर्वांना वाटते. पण ते एक स्वप्नच रहाणार कां असे वाटू लागले आहे. 2 वर्षांपूर्वी या बाबतीत आपण बरीच वाटचाल केली. पण मग अशा जंक्शनला पोहोचलो की तेथे रस्त्यावर मार्गदर्शक खुणा नसल्यामुळे वाटचाल जवळजवळ थांबलीच.

पुनश्च या बाबतीत हालचाल होण्याची शक्यता आहे. असे झाल्यास आपण सर्वांकडून मदतीची अपेक्षा करु. वास्तूचे स्वप्न साकार होणे आपणा सर्वांच्या सहकार्यावर अवलंबून आहे हे सांगणे नलगे!

— काशीनाथ घाणेकर.

## दिवाळी शुभेच्छा

मित्रमैत्रिणी येती घरी योगे दिवाळी
आठवणींचे इंद्रधनुष्य सप्तरंग उधळी

मित्र जुने भासती आकाशातील तारे
कुणी न सांगे त्यांना जरा दूर व्हारे

मैत्रिणी नित्यस्मरे उगवता रेखिव नक्षत्रे
आठवण त्यांची येता मन प्रेमाने गहिवरे

मैत्रिणी सुंदर शालीन सुस्वभावी सरळ मनी
होता विवाह पती ठरले सौभाग्य सौजन्याचे धनी

रात्र पडे अपुरी बघता नक्षत्रे तेजस्वी
चमचम लखलख सांगे व्हा सदैव ओजस्वी

नवा देश नवी संस्कृती मित्रांची पटली महती
मित्रमैत्रिणी हीच संपत्ती सांगे लक्ष्मी सरस्वती

जुन्या आठवणी दूरदेशी नित्यस्मरे मोहरपण
मित्रमैत्रिणींचे स्मरण हेच माझे दिवाळीपूजन

रिध्दी सिध्दी गौरी याव्या सौभाग्य देण्या घरी
येते सर्वांची आठवण होता दिवाळी साजरी

दिवाळी करो सुख सौभाग्य संपन्नतेचा वर्षाव
असा निसर्ग करी स्वच्छ शुध्द सुंदर हिमवर्षाव

- श्री. मधुसुदन भिडे

'लठ्ठ माणस मनमिळाऊ का असतात?' त्याचे एक उत्तर असे की, त्यांना मारामारी करणेही शक्य नसते आणि पळून जाणेही शक्य नसते. मग ती आपोआपच मनमिळाऊ होतात.

नंदकुमार ठकार.

## दीपावली

दीपांची आवली ही दीपावली
सर्वांवर पडो सुखाची सावली

दीपावलीचा पहिला दिवस नर्कचतुर्दशी
अभ्यंगस्नानाची आठवण की हो आली
आमलात आणण्याची मात्र घाई नाही केली
डायटची डायरी चार दिवस जरा बाजूस सारली
डायटची डायरी चार दिवस जरा बाजूस सारली

दुसरा दिवस लक्ष्मी पूजन
शालू शेले नेसले गृहलक्ष्मी सजली
लाडू करंज्या अनारसे पक्वान्ने केली
मित्रपरिवारासह मनोभावे लक्ष्मीपूजा केली
दागिन्यांनी नटलेली बायको थोडी जास्त स्थूल वाटली

तिसरा दिवस पाडवा
नवऱ्याचा आजतरी गावा गोडवा
जुन्या चालीरित्या पाळण्यात त्यांचा बाई हातखंडा
आठवण करवून मिळवला हिऱ्याचा नाजूक कंठा

चवथा दिवस भाऊबीज
भावा बहिणींची असावी प्रीत
बहिणींनी भावाना ओवाळण्याची पाळली रीत
समान हक्काच्या दुनियेत भावांनीच ओवाळून
का घ्यायचे ही केली जिद
आता तुम्हीच सांगा आपण आता बदलू नये का
जुनी स्वार्थी रीत

- सौ. अर्चना बापट

चित्ताच्या ठायी प्रसन्नता असेल तर जग प्रसन्न वाटते. नि चित्ताच्या ठायी विषण्णता असेल तर सर्व जग विषण्ण वाटते. म्हणून ज्यांना सुखाची इच्छा आहे त्यांनी मन उल्हसित ठेवण्याचा प्रयत्न करावा.

नंदकुमार ठकार.

# मंडळाचे मानपत्र

१९८३ साली सौ. सुशिला हेबळे अध्यक्षा व मी चिटणीस असतांना मंडळाने 'मानपत्र' देण्याची कल्पना प्रत्यक्षांत आणली. तत्संबंधित बैठकीत मी व कार्यकारी समिति-सदस्य डॉ. बाळ जोशी यांनी खालील ठराव मांडला व जो सर्वानुमते पास झाला. या ठरावावरून मानपत्रामागील भूमिका आपल्या लक्षांत येईल:

"एखाद्या व्यक्ती, कुटुंब किंवा संस्थेच्या दीर्घ/निष्ठापूर्वक/मौलिक कार्याने जर मंडळाच्या सर्वांगीण उन्नतीस/प्रगतीस आमुख्याने हातभार लावला गेला/जात असेल, तर अशा व्यक्ती, कुटुंब किंवा संस्थेचा मराठी भाषिक मंडळ दिवाळीच्या प्रसंगी 'मानपत्र' देऊन गौरव करेल.

"या मानपत्रासाठी उचित नांवे त्या वर्षीच्या कार्यकारी समितीने दिवाळीच्या आधी होणाऱ्या बैठकीत विचारांत घ्यावी व निवड बहुमताने करावी.

"ही निवड दिवाळीच्या कार्यक्रम-प्रसंगी जाहिर करावी."

या ठरावान्वये गेली ८ वर्षे मंडळाच्या कित्येक गुणी लोकांचा मानपत्राचे मानकरी म्हणून आपण गौरव केला आहे.

१९८८ साली डिसेंबरच्या सर्वसाधारण सभेत असा विचार मांडण्यात आला की मानपत्रा-साठी नांवे मंडळाच्या सभासदांकडून मागविण्यांत यावी. त्या आधी कार्यकारीणीचे सदस्य उचित नांवे सुचवून त्यावर मतदान करायचे. हा बदल १९८९ सालापासून अंमलात आणला गेला आहे. यावर्षीही श्रीगणपती कार्यक्रमाच्या दिवशी अध्यक्ष श्री. हेमंत कंदळगांवकर यांनी आपणाला अशी नांवे सुचवायची विनंती केली होती. १९९० साली ठरावाच्या पहिल्या वाक्यांत 'प्रगतीस/' नंतर '/नांवलौकिकास' हा शब्द वाढवण्यात आला व अशाने मान-पत्राच्या terms of reference विस्तृत करण्यात आल्या.

गेल्या ८ वर्षांचे मानपत्राचे 'मानकरी' खालीलप्रमाणे :

| | |
|---|---|
| १९८३ | श्री. नाना व सौ. लिलाताई टेंबे |
| १९८४ | डॉ. केशव व सौ. मंदाताई टिळक |
| १९८५ | बृहन्महाराष्ट्र मंडळ - टोरांटो अधिवेशन - नियोजन समिति |
| १९८६ | 'एकता' - श्री. विनायक गोखले |
| १९८७ | श्री. राया बिडये |
| १९८८ | सौ. सिंधूताई साने |
| १९८९ | श्री. श्रीराम मुळगुंद आणि डॉ. काशिनाथ घाणेकर |
| १९९० | डॉ. विद्याधर गोडांबे, सौ. सविता जुन्नरकर आणि श्री. अशोक पांगारकर |

ज्यांची नांवे वर नाहीत त्यांचे काम उणे आहे असा मात्र निष्कर्ष काढणे चुकीचे होईल! जरा सबूर करा, मंडळाची कामे करत रहा - कधीतरी मंडळाचे सदस्य तुमचे नांव सुचवून तुमचा मान नक्कीच करतील!

१९९१ सालचे मानपत्र 'मानकरी' कोण? दिवाळीच्या कार्यक्रमप्रसंगी त्या रहस्याचा उलगडा होईल!

— काशीनाथ घाणेकर.

## टोरांटोत मराठी पुस्तकांची वाटचाल : एक निवेदन...

लेखक - श्री गंगाधर देशपांडे

१९६९ चा वसंतऋतू. टोरांटोच्या परिसरातील मराठी मंडळींनी एकत्र येऊन त्यावर्षीच्या दिवाळीला मराठी नाटक सादर करावयाचे असे ठरवले. थोड्या-फार चर्चेनंतर पु. ल. देशपांडे यांचे 'अंमलदार' हे नाटक सर्वानुमते ठरले. पण त्यात एक अडचण होती. 'अंमलदार' नाटकाचे पुस्तक कोणाजवळच नव्हते. विंडसरपासून ऑटवापर्यंत मराठी मंडळींकडे पुस्तकाची विचारणा झाली. पुण्याच्या 'इंटरनॅशनल बुक सर्व्हीस'च्या श्री. दिक्षीत यांना तार करून पुस्तक पाठविण्याबद्दल कळवले. पण त्यांनाही पुस्तकाची प्रत कोठे मिळू शकली नाही. शेवटी वॉशिंग्टनला लायब्ररी ऑफ काँग्रेसकडे धाव घेतली. तेथील श्री मोहन गेद्र यांनी त्या पुस्तकाची कॉपी करून पाठविली व हौशी कलाकारांनी ते नाटक १९६९च्या दिवाळीला सादर केले.

त्या अनुभवानंतर, टोरोंटोत मराठी पुस्तके वाचावयास मिळाली तर चांगले होईल असे वाटल्या-वरून येथील सार्वजनिक ग्रंथालयांकडे चौकशी केली. टोरोंटो युनिव्हर्सिटी लायब्ररीखेरीज इतर कोठेच मराठी पुस्तके नव्हती. पब्लिक लायब्ररीकडे चौकशी करता 'आजपर्यंत मराठी भाषेतील पुस्तके कोणी मागितलीच नसल्याने, ती पुस्तके घेतली गेली नाहीत' असे सांगण्यात आले. मराठी पुस्तकांना सतत मागणी राहील ही खात्री नसल्याने कोणतीही लायब्ररी ही पुस्तके घेण्यास तयार नव्हती.

१९७१ च्या मराठी भाषिक मंडळाच्या कार्य-कारिणीने पुढाकार घेऊन पुण्याहून मराठी पुस्तके मागविली, व मेट्रो टोरोंटो लायब्ररीला भेट म्हणून दिली. पुस्तके उपलब्ध झाल्यावर बऱ्याच वाचकांनी ती घरी नेण्यास सुरवात केली. १९७४ साली पुन्हा एकदा मंडळाने आणखी काही पुस्तके मेट्रो लायब्ररीला भेट दिली. तो पर्यंत त्या पुस्तकांना मागणी आहे हे सिध्द झाले होते. त्यामुळे १९७४ पासून मेट्रो लायब्ररीने त्यांच्या बजेटमधून मराठी पुस्तके विकत घेण्यास सुरवात केली. सुरवातीस जरी ही पुस्तके 'कॉलेज स्ट्रीट' शाखेमध्येच मिळत होती तरी हळूहळू मागणीनुसार इटोबिकोक, नॉर्थ यॉर्क, स्कारबरो वगैरे लायब्ररीतूनही ती उपलब्ध झाली. आता तर ती मिसीसागा, ब्रॅम्पटन येथील लायब्ररीमध्ये सुध्दा ती मिळतात.

अलिकडल्या काही वर्षात नवीन प्रसिध्द झालेली मराठी पुस्तके फार कमी प्रमाणात मिळतात. ह्या बाबतीत चौकशी करता असे सांगण्यात आले की मराठी पुस्तकांची मागणी गेली काही वर्षे कमी झाली आहे. प्रत्येक वाचनालयात पुस्तकांच्या मागणीबाबत आकडेवारी ठेवली जाते. वर्षाच्या अखेरीस एखाद्या भाषेतील पुस्तकांची मागणी कमी झालेली आढळल्यास पुढील वर्षात त्या पुस्तकां-वर कमी खर्च केला जातो.

वास्तवीक पुस्तकांची मागणी कमी होण्यास बरीच कारणे असू शकतात. उदाहरणार्थ शेल्फवर असलेली पुस्तके वाचून झालेली असतात व बराच काळ ती शेल्फवर पडून राहतात. कधी कधी चांगल्या लेखकांची किंवा चांगल्या विषयावर पुस्तके उपलब्ध नसतात. पण ही कारणे वाचकांनी ग्रंथपालाच्या नजरेस आणून दिल्याखेरीज त्यावर उपाययोजना होऊ शकणार नाही.

नवीन मराठी पुस्तके हवी असल्यास, संबंधीत ग्रंथपालास, हवे असलेले विषय व लेखक ह्यांबद्दल सांगितले पाहिजे. पुस्तके घरी नेऊन त्यांच्या मागणी-बाबत आकडेवारी सुधारण्यास मदत केली पाहिजे.

मराठी भाषिक मंडळाने वीस वर्षांपूर्वी प्रयत्न-पूर्वक मराठी पुस्तके टोरांटो व आसपासच्या वाचना-लयातून उपलब्ध करण्यात पुढाकार घेतला. ही पुस्तके ग्रंथालयात टिकवून ठेवणे आता आपल्या हाती आहे.

# मी व सर जॉन. ओ. मॅकडोनाल्ड :

लेखक - श्री. अजित कुकडे.

असाच मी पार्लमेंटहिलवर सायंकाळी ७-चे सुमारास चालत होतो. हवेत गारवा होता, थोडा पाऊसही होता साथीला मंद धुक पण. पांच मिनीटे चालल्यानंतर एक अस्पष्ट आकृती माझ्याकडे येताना दिसली. मीं जरा बावचाळलोच. ते समजून त्या आकृतीने मला घाबरू नको असा संकेत केला व माझ्या जवळ आली. चेहरा थोडा ओळखीचा वाटला. तो वर ती आकृती हलक्या आवाजात म्हणाली, 'हे बघ, घाबरू नकोस, मला तुझी मदत हवी आहे.' मला क्षणांत लक्षांत आले व मी म्हणालो, 'अरे, तुम्ही तर सर जॉन ओ.'

'अरेच्चा तू कसे ओळखलेस' आकृती मला म्हणाली 'मला तर कॅनडात जन्मलेली लोक-सुद्धा ओळखत नाहीत आणि तू तर इमिग्रांट आहेस.' मी म्हणलो, 'कसच कसच' पण तरीही मूठभर मांस माझ्या अंगावर चढलेच. (जणू कांही त्याची मला जरुरीच आहे).

हे पहा मला शंभर वर्षानंतर पुन्हा येथे येवून कॅनडाची प्रगति व हाउस ऑफ कॉमन्स बघायची आहे, मला मदत कर. बरं, सध्या पंत-प्रधान कोण आहे? आता मला धीर आला. सर जॉन ओ व मी एकत्र चालू लागलो, व मी उत्तरलो, 'ब्रायन मुलरोनी', तुमच्याच कॉन्झर्व्हेटीव्ह पार्टीचा आहे. अरे वा त्यानी मग देशाची चांगलीच प्रगति केली असेल, काय सर्व जनता खूष आहे ना?

'खूप! अहो पोस्टऑफीस संपावर'- माझे बोलणे अर्ध्यावर तोडत जॉन ओ म्हणाले 'म्हणजे माझ्या वेळे पासून पोस्ट ऑफीस संबधात कांही बदल झालेला दिसत नाही, बर पुढे सांग.

सिव्हील सर्व्हंटस्, ग्रेन हॅंडलर्स, सर्व संपावर आहेत. फक्त पी ई आय चे बटाटेचे दलाल व ओंटारीओचे एग मार्केटींग बोर्ड सोडून, मी वदलो. 'ते बर झाल, निदान लोकांना उपाशी राहवे लागणार नाही,' सर जॉन ओ. त्याकरीता नाही, मुलरोनीला मारण्यासाठी त्या बटाटे-अंड्याची पैदाईस होत आहे, मी. एवढ बोलत आम्ही कॉमन्सच्या आंत जाणाऱ्या स्लाईडींग डोअरपाशी आलो. अर्थात सर जॉन ओ माझ्याशिवाय कोणाला दिसत नव्हते. त्यांनी आता अदृश्याचे रुप घेतले होते. दारापाशी येताक्षणी दरवाजा साईडवे आपोआप उघडला. तो पाहताच सर जॉन ओ चकीत झाले! मी त्यांना गप्प राहण्याची खूण केली, पण त्याचवेळी जो क्लार्क समोरुन बाहेर येत होता. मी क्रॉस होता-क्षणीच थॅंक यू! म्हणाले. एस् जे ओ ना आश्चर्यच वाटले. ते म्हणाले, हे कोण? आणि उगाचच थॅंक यू कां म्हणाले?

हे जो क्लार्क - पूर्वी ते परराष्ट्रमंत्री होते. तेव्हां डोअरमनने त्यांच्यासाठी दार उघडायची त्यांना सवय होती व मग रुबाबात ते थॅंक्स् म्हणत. आता युनिटी मिनिस्टर आहेत. रुबाब संपला पण थॅंक यू म्हणायची सवय गेलेली नाही. दार जरी आपोआप उघडले तरीही ते थॅंक यू म्हणतात, मी.

पण हे युनिटी मिनिस्टर म्हणजे काय? एस् जे 'हा आता क्यूबेक स्वतंत्र होवूं पहात आहे, म्हणून देश एकत्र ठेवण्यासाठी जो प्रयत्न करीत आहे,' मी.

काय देश दुभगणार आहे? एस् जे ओ, खिन्न मनाने म्हणाले. ही खिन्नता भारताची फाळणी झाल्यावर सावरकरांची झाली होती त्याच्या दुप्पट दिसली.

'हो. ते बघा. समोरुन जे दोघे येत आहेत त्यांचीच ही करामत'- मी. हे कोण? एस् जे ओ.

'केस पिंजारलेला तो लुशीयाऽऽन व बुशीयाऽऽर्ड व तो भव्य माणूस पेरीजो. हे या कटाचे सुत्रधार आहेत,' मीं हे सांगत असतानाच आम्ही कॉमन्समध्ये प्रवेश केला.

तेथील दृश्य पाहून एस् जे ओ ने एक नाही तर पांचही बोटे तोंडात घातली.

ही बाई डेस्कवर उभे राहून तावा-तावाने कां बोलतीय? एस् जे ओ वदले.

'अहो ही डिपुटी लिडर - लिबरलची-

तीला पी एम् व्हावयाचे आहे म्हणून टी.व्ही वर ॲक्शन दिसावी म्हणून तिचा हा पवित्रा आणि हातात स्वेट साईन धरलेला अल्बर्टो चा बील केमफ्लींग' मी म्हणालो.

'आणि तो झोपलेला कोण ?' एस् जे अे.

'तो जॉन कॉस्ट्री-न्यूफाय. तोही बरेच प्रमाद करून सरकारी पक्षाला लाज आणत असे. त्यामुळे त्याला हाऊस मध्ये येण्यापूर्वी झोपेचे (मार्फीन) इंजेक्शन देतात. म्हणजे तेवढीच शांतता.

'मग त्याला आणतात तरी कशाला ? एस् जे.

'मतदानाची वेळ आली की शेजारच्या मंत्री त्याचा हात वर करतो,' इति मी.

एस् जे अे ने सर्वत्र नजर टाकली. एक सभासद एका बाईचे केस ओढतो, तर दुसरा बाण मारतोय, तीसरा चित्रच काढत बसला आहे. हे दृश्य पाहून एस् जे अे ला तर शाळेचीच आठवण झाली. त्याचा विस्मय पाहून मी म्हणालो, ही मजा रोजच चालते. हल्ली लहान मुले कार्टुनस् बघायची सोडून कॉमन्स चॅनेलच पहातात. त्यांची तेवढीच करमणूक होते.

कॉमन्सच्या हा अधःपात बघून त्यांच्या डोळ्याची कड ओली झाली. ते मला म्हणाले, बस झाले बाबा. मी परत जातो. हा व्हास मी पाहू शकत नाही, असे म्हणून ते मला बाहेर घेवून आले व हळू हळू धुक्यात विरून गेले. मीही यापुढे कॉमन्समध्ये पाऊल न टाकण्याची शपथ घेतली.

**फिटनेस, शारिरीक व मानसीक आरोग्य**
**WELLNESS PROGRAM**

वरील विषयावर फेब्रुवारी १९९२ मध्ये एक दिवसाचा सेमिनार आखीत आहोत. त्याची रूपरेषा पुढीलप्रमाणे.

① स्वतःच्या आरोग्याची जबाबदारी ② समतोल आहार ③ एअरोबिक्स ④ योगासने ⑤ मनावरचा ताण ⑥ मेडिटेशन ⑦ समतोल आहार

न्युट्रिशनिस्ट, डॉक्टर व इतरांनी भाग घ्यावा अशी अपेक्षा आहे. बाहेरचे तज्ञ पण बोलवण्यात येतील.

सेमिनारमधे भाग घेण्याची इच्छा असेल त्यांनी कृपया संपर्क करावा

श्रीराम मुळगुंद 493-7582
शशी करंदीकर 820-2817

**(योगासनाचे वर्ग सुरू झाले आहेत)**

## सुमंगल समयी.

काय वदू या सुसमयाला,
मांगल्याची वर्षावचि हा,
पावित्र्याची की, ही वेळा,
विमलताच की तव-हृदयीची घेई नवरूपाला

ध्येये प्रेरित अंतर तुमचे
रक्ताहुनि श्रेष्ठची नाते त्याचे,
झुगारून द्या मोह-पाश हा स्वामी भृत्य, राष्ट्र, जयाचे

व्यसनांचा जरी तिमीर दाटला,
गलित धैर्य परि तुम्हि नच झाला,
धैर्याने जा धावत पुढति, यशाची उभे करित प्रतीक्षेला.

इहि संपादा ऐहिक सुख शांती,
नि:श्रेयसही तया मागुति,
उभे ठाकुनि ध्येय पथावरी दावा सन्मार्ग जनासि.

स्वाभिमान जरी अंतरी भरला,
परि नच सोडा कधी विनयाला,
विश्वाच्या संसारी या मग काय उणे सौख्याला.

संपत्तीचा लेश नसेची,
समयी देऊ या भेट कशाची,
चित्साक्षीची मम हृदयीची,
हीच भेट अक्षरी.

**सौ. सिंधुताई पारखी.**

# असावे घरटे अपुले छान :

लेखक : नंदकुमार ठकार.

सुमारे वीस वर्षांपूर्वी एक मराठी तरुण त्याच्या बायकोला घेवून भारतातील महाराष्ट्र या राज्यातील पुण्यनगरीतून अतिपश्चिमेकडील या देशात आला. महाराष्ट्रीयन माणूस इतक्या लांब आपले वसतिस्थान करावयास निघाला आहे म्हणून त्याचे भरपूर कौतुक झाले. इथे येण्यापूर्वी बऱ्याच मित्रमैत्रिणींकडून आणि नातेवाईकांकडून जगाच्या पाठीवर कोठेही गेलास तरी महाराष्ट्रीयन परंपरा जतन करून ठेवण्याचा सल्ला त्याला मिळाला.

या नवीन भूमीवर पाऊल टाकल्यावर त्याच्या सारखाच कोणी महाराष्ट्रीयन या भूमीवर आला आहे का म्हणून तो तपास करु लागला, पण कांही यश आले नाही. अशीच वर्षे जात राहिली आणि हळूहळू मायभूमीत मागे राहिलेल्या लोकांकडून अमका येत आहे, तमका येत आहे, त्याची सोय कर, त्याला मदत कर म्हणून पत्रावर पत्रे त्याला येवू लागली. थोडक्यात पश्चिमी देशांचे आकर्षण आणि महत्व त्याच्या मागे राहिलेल्या बांधवांना पटू लागल्याचे ते द्योतक होते.

म्हणता म्हणता. 30/40 कुटुंबांनी या भूमीवर आपले बस्तान बसविले आणि एकमेकात विचारांची देवाणघेवाण सुरु झाली. महाराष्ट्रीयन परंपरा या भूमीवर जतन करून ठेवण्याची नामी कल्पना नवीन आलेल्या सर्वच लोकांना आवडली आणि त्यातून मराठी भाषिक मंडळाचा जन्म झाला. आपल्या लोकांना एकत्र भेटण्याची संधी मिळाल्याचे समाधान प्रत्येक सभासदाच्या चेहऱ्यावर दिसू लागले.

जसजसे दिवस जावू लागले तसतसे सर्वच महाराष्ट्रीयन सण साजरे होवू लागले. मायभूमी-तील आठवणी काढत काढत येथील वातावरणाला साजेल त्याप्रमाणे त्या सणांना साजरे करण्याच्या पध्दतीत आटोपशीरपणा येवू लागला पण त्याची खंत कोणालाच वाटली नाही. कार्यक्रमाला हजर राहणारांची संख्या, नवीन लोक जसजसे येवू लागले तसतशी वाढायला लागली. कोणाचे-तरी घरी होणारा कार्यक्रम मग भाड्याची जागा घेवून होवू लागला. यातूनच महाराष्ट्र भवनाची नामी कल्पना एकमेकांनी उचलून धरली. जोपर्यंत आपण आपली स्वतःची वास्तु करून भक्कम पाया रोवत नाही तो पर्यंत महाराष्ट्रीयन परंपरा जतन करून ठेवण्याच्या कल्पनेला कांहीच अर्थ नाही याची सर्वांनाच मनोमन खात्री पटू लागली.

कांही उत्साही लोकांची एक समिती महा-राष्ट्र भवनाची रुपरेषा तयार करण्यासाठीं स्थापन करण्यात आली. समितीवरील लोकांनी आपापल्या-परीने 1/2 वर्षे उलटसुलट चर्चा करून एक आराखडा तयार केला आणि सभासदांसमोर समर्थपणे मांडला. सर्व सभासदांना वास्तुचे महत्व कळाले परंतु सर्व आराखडे कागदावरच राहिले. हळू हळू वास्तु विषयीचा विचार मागे पडू लागला.

१/२ वर्षांपूर्वी, या देशात प्रथम येवून स्थायिक झालेल्या त्या तरुणाचा एक जुना मित्र आपले निम्मे आयुष्य मायभूमीवर काढल्यानंतर संधी मिळाली म्हणून येथे आला. दोघांनाही कामाची आवड मुळातच असल्यामुळे एक वर्ष दोघांनी मंडळावर एकाच वेळी काम करून भरपूर परिश्रम घेतले. सर्व सभासदांना महाराष्ट्र भवनाचा आरा-खडा पुन्हा एकदा समजावून सांगितला. जुन्या जाणकार आणि काम केलेल्या सभासदांनी त्या दोघां-वर महाराष्ट्र भवनाचे काम करण्यासाठी सारख्या विचाराचे एक मंडळ निवडण्याची जबाबदारी टाकली.

दिवाळीच्या कार्यक्रमाचे वेळी सर्व सभासदांना उत्तम फराळ आपण मिळवून देणार या कल्पनेनेच ते दोघे भारावून गेले. आपल्या मराठी लोकांच्या घर-टयाचा आराखडा मनाशी बांधायला लागले.

आर्थिक पाठबळाशिवाय इतका मोठा प्रकल्प हाती घ्यायचा म्हणजे पावले फारच जपून टाकली पाहिजेत याची दोघांनाही कल्पना आली म्हणून आपल्या वास्तुसमितीवर आर्थिक पाठिंब्याबरोबर एकनिष्ठेने काम करणारे लोक निवडण्याची जबाब-दारी दोघांवर येवून पडली. बरेच दिवस विचार

1 architect 2 civil Eng 3 Elec Eng 4 Auditor? 5 Industrialist

केल्यावर त्यांनी असा निष्कर्ष काढला की समितीवर एक स्थापत्यविशारद, स्थापत्यअभियंता, विद्युत अभियंता, प्रबंधक, उद्योगपती याशिवाय दरवर्षी मंडळावर काम करणारे अध्यक्ष व चिटणीस यांची नेमणूक करावी.

समितीची स्थापना झाल्यावर त्यांच्या लक्षांत आले की "मराठी भाषिक मंडळ" ही ना नफा ना तोटा अशी संस्था असल्यामुळे आपल्याला प्रकल्पासाठी वेगळी संस्था स्थापन करणे भाग आहे. अशी वेगळी संस्था स्थापन केल्यामुळे भाग भांडवल जमा करण्याचे काम सोपे होईल. मराठी भाषिक मंडळाच्या प्रत्येक समासदाला त्याचे हिश्शात वास्तुच्या मालकीहक्क मिळेल. मराठी भाषिक मंडळ स्वतंत्ररित्या आपल्या कार्यक्रमातून खर्च वजा जाता जमा झालेली गंगाजळी नवीन संस्थेचे भाग भांडवल खरेदी करून एकप्रकारे मालक होवू शकते. अशा भाग-भांडवलदारांचे आर्थिक पाठबळ मिळाल्यावर कोणतीही आर्थिक संघटना नवीन संस्थेच्या हितासाठी समर्थपणे उभी राहू शकते आणि सर्व कार्यभाग सोपा होतो.

वरील सर्व गोष्टींची पुर्तता झाल्यावर वास्तु कोठे, कशी काय, काय काय सोयींनी युक्त असावी या विचारापर्यंत ते दोघेजण आले. मोजक्या लोकांनी ते ठरविण्यापेक्षा मराठी भाषिक मंडळाच्या सर्व सभासदांचा त्यात सहभाग असावा म्हणून त्यांनी एक स्पर्धा ठेवली. त्याचे परीपत्रक दिवाळीचे कार्यक्रमाचे दिवशी सर्व सभासदांना वाटले. सर्व सभासदांची उत्तरे येईपर्यंत ते दोघे पुढे काहीच करू शकत नव्हील, बिच्चारे!

- मुंबई शहर का वाढले?
  कारण आरंभी ते लहान होते म्हणून!

- जगात अनेक कवी हीन स्थितीत का राहतात?
  कारण जगात अनेक हीन कवी आहेत!

- कांही पुस्तके पुस्तके असतात नी काही नसतात जी नसतात त्यांना 'रद्दी' म्हणतात.

## माझी माती

सुगंध दरवळतो मातीचा सडा शिंपता अंगणी
प्रसन्न मन माझे होते किती ती माती गुणी
कृत्रिम अत्तरे इथे मारतो मी सर त्यासी नाही गुणी
किती झाले तरी माझी तीच माती गुणी

रांगोळी काढता दारी शोभे घर माझे भारी
तुळशीवृंदावन पण वाढवी शोभा त्याचे परी
ख्रिसमस ट्री इथे लावली त्याला तुरेही भारी
तुळशी मंजुळे सर नाही, माझी तीच माती खरी

सूर्यकिरणे घरात शिरून पवित्र करती चारी कोपरे
उबदार राही घर माझे, उघडी सदैव खिडक्या दारे
सूर्याला इथे वावच नाही सदैव बंद खिडक्या दारे
माझ्या पक्क्या घरा सर नाही माझी तीच माती बरे

बारमाही भाजीफळे पिकती मां परसात
त्याची चवही मधूर, वाटे बसावे खात
कृत्रिम भाजीफळे खाऊन येथील भरतो अंगा वात
म्हणून होतो संधिवात, बसावे तीच माती खात

निद्राधीन होण्या उशी गादीची साथ कापूस रुईचा त्यात
नकळत झोप लागे गत दिवस विसरण्या कशी शांत
स्प्रिंगच्या गाद्या वापरतो येथे रगडतो पाठी हात
शांत झोप लागत नाही, आठवते त्या मातीची साथ

सात दिवस काम करी तेथे नाही कधी थकवा
कष्ट करण्या शरीर ताजे नाही काम चकवा
पांच दिवस काम येथे वाटते कधी सुटका
शनि रवी घरी बसूनी, ध्यास त्या मातीचा फुका

पैसे कमविण्या आलो मी येथे वचन देवून त्या मातीला
नक्की परत येईन तेथे, तुझ्या संगतीला
दिवस जसे जात राहिले ताबा गेला मना
वंचित मी झालो तुला, नक्की येईन कधीतरी पुन्हा

- श्री. नंदकुमार ठकार

# MARATHI BHASHIK MANDAL,TORONTO (INC)

## BALANCE SHEET AS AT DECEMBER 31,1990

| ASSETS: | DEC.1990 | DEC.1989 |
|---|---|---|
| BALANCE WITH BANK | 1,457.97 | 3,403.91 |
| BALANCE IN MONEY MARKET A/C | 8,589.51 | 0.00 |
| INVESTMENT IN G.I.C. | 34,000.00 | 34,000.00 |
| ACCRUED INTEREST | 2,276.81 | 1,334.96 |
| BOOKS INVENTORY | 212.50 | 270.00 |
| SUNDRY RECEIVABLES | 80.00 | 40.00 |
| TOTAL | 46,616.79 | 39,048.87 |

| LIABILITIES AND RESERVES: | | DEC.1990 | DEC.1989 |
|---|---|---|---|
| ACCOUNTS PAYABLE | Carryover↓ For 1990↓ | 20.00 | 838.00 |
| SCHOOL RESERVE | (1964.96 + 1753.86 =) | 3,718.82 | 1,964.96 |
| STUDENT ACHIEVEMENTS RESERVE | | 862.90 | 900.90 |
| MEMBERSHIP FEES | | 0.00 | 75.00 |
| | | 4601.72 | 3,778.86 |
| GENERAL RESERVE | | | |
| BEGINNING BALANCE | | 35,264.01 | 23,980.41 |
| ADDITIONS DURING THE YEAR | (8504.92 − 1753.86 =) | 6,751.06 | + 11,283.60 |
| | | + | |
| | | = 42,015.07 | = 35,264.01 |
| | 4,601.72 + 42,015.07 → | | 3778.86 + 35,264.01 |
| TOTAL | | = 46,616.79 | = 39,042.87 |

PRESIDENT TREASURER AUDITOR

TORONTO
JUNE 24,1991

9E

# MARATHI BHASHIK MANDAL,TORONTO (INC)

## STATEMENT OF RECEIPTS AND DISBURSEMENTS FOR THE YEAR ENDED DECEMBER 31,1990

| | RECEIPTS | DISBURSEMENTS | DIFFERENCE |
|---|---|---|---|
| EDUCATIONAL: | | | |
| YOUTH CAMP/FIELD DAY | 2,037.00 | 2,289.20 | (252.20) |
| SCHOOL PROGRAM | 2,725.00 | 971.14 | 1,753.86 |
| | 4,762.00 | 3,260.34 | 1,501.66 |
| RELIGIOUS: | | | |
| VASANTIK | 724.00 | 1,620.08 | (896.08) |
| GANAPATI | 1,552.45 | 778.51 | 773.94 |
| DIWALI | 3,108.01 | 3,675.65 | (567.64) |
| | 5,384.46 | 6,074.24 | (689.78) |
| CULTURAL: | | | |
| VARIOUS | 0.00 | 323.50 | (323.50) |
| SOCIAL EVENTS: | | | |
| SHISHIR | 2,020.00 | 2,118.14 | (98.14) |
| PICNIC | 144.00 | 606.10 | (462.10) |
| X-MAS PARTY | 0.00 | 425.00 | (425.00) |
| YOUTH EVENTS | 109.00 | 355.00 | (246.00) |
| | 2,273.00 | 3,504.24 | (1,231.24) |
| OTHER: | | | |
| 1990 SUBSCRIPTION | 1,340.00 | | 1,340.00 |
| 1990 SUBSCRIPTION-ANNUAL | 4,800.00 | | 4,800.00 |
| INTEREST INCOME | 4,263.56 | | 4,263.56 |
| MEMBERSHIP OF B.M.M. | | 100.00 | (100.00) |
| MISC.EXPENSES | 1,136.26 | 2,192.04 | (1,055.78) |
| | 11,539.82 | 2,292.04 | 9,247.78 |
| TOTAL | 23,959.28 | 15,454.36 | 8,504.92 |

TORONTO
JUNE 24,1991

PRESIDENT TREASURER AUDITOR

8504.92
-1753.86
6751.06

school Prog. profit

# - स्नेहबंध -

## संपादकीय -

टोरांटो व आसपासच्या शहरातील मराठी बांधवांना एकत्रित आणणारा हा 'स्नेहबंध' आपणा सर्वांना सादर करतांना आम्हास फार आनंद होत आहे. मंडळातर्फे प्रसृत होणाऱ्या वार्तापत्रासाठी जी काही नावे पुढे आली त्यात अनामिकांचे 'स्नेहबंध' हे नामकरण पुष्कळांना आवडले. आपणासही ते पसंत पडेल अशी आशा आहे.

तेरा मार्च रोजी डॉ. टिळक यांच्या निवासस्थानी भरलेल्या सभेत कार्यकारिणीतील काही अनुभवी व तज्ज्ञ व्यक्तींनी निवृत्तीची विनंति केल्याने, काही नवीन व्यक्तींचा समावेश करून नवीन कार्यकारी मंडळ नियुक्त करण्यात आले. सर्वांच्या माहितीसाठी सध्याच्या कार्यकारिणीतील सभासदांची नावे व दूरध्वनि क्रमांक देत आहोत.-

1) डॉ. टिळक (अध्यक्ष) ४४५-९९२८
2) सौ. टिळक (लेखापाल) ४४५-९९२८
3) श्री. बाळ जोशी ७५१-४३०८
4) श्री. श्रीराम मुळगुंद ४४४-५००९
5) श्री. अरुण रानडे ४२९-०९२५
6) श्री. गंगाधर देशपांडे ४५९-४६८८
7) श्री. रवि करमरकर ४४४-२९५९
8) डॉ. प्रताप रांगणेकर २७९-३९८५
9) श्री. नारायण कंदलगांवकर (लेखापाल) ४९५-६९६०
10) सौ. कुंदाताई पाटील २३९-९५४७
11) श्री. दत्ता सायगांवकर (कार्यवाह) ५३३-५३९६

नवीन कार्यकारी मंडळ नेमल्यामुळे नवे सभासद आपल्याबरोबर नवीन कल्पना व उत्साह आणून कार्यक्रम अधिक यशस्वी करतील अशी कल्पना आहे. अशाप्रकारे नवीन लोकांचा मंडळाशी जास्त निकटचा संबंध येऊन मंडळाची अंतर्गत व्यवस्था जास्त सभासदांना समजेल. त्याचबरोबर कार्यक्रम चांगले पार पाडण्यासाठी कार्यकारिणी मंडळास आपणा सर्वांच्या सहकार्याची जरूरी आहेच, तेव्हा कोणत्याही प्रकारची मदत, क्रियाशील सूचना देऊ इच्छिणाऱ्यांनी कार्यवाहांशी संपर्क साधावा. मंडळाशी संपर्क साधून आपल्या अंगच्या कलेची अभिव्यक्ती करू इच्छिणाऱ्या कलावंतांकडून कार्यक्रम ठरविण्यासाठी वाढत्या प्रमाणात चौकशी केली जात आहे. त्यापैकी काही खालीलप्रमाणे:-

1) टाऊन अँड्रियातील सेवकांचे 'कलाकार' पथक - 'रवून पहाता करून'
'तुझे आहे तुजपाशी'
2) कु. प्रभा अत्रे - नवोदित सुप्रसिद्ध गायिका - शास्त्रोक्त व भावगीते
3) सौ. मीनाक्षी ठाकोर - अहमदाबादच्या प्रसिद्ध नृत्य-विशारद.
4) श्री. अरविंद गजेंद्रगडकर - संगीत समीक्षक व वादनपटु.
5) श्री. सुधीर फडके - ख्यातनाम पार्श्वगायक.

शक्यतो प्रत्येकाच्या कलेस उत्तेजन देण्याचा प्रयत्न मंडळ करीत असून, यथावकाश कार्यक्रमांची पूर्वसूचना सर्वांना दिली जाईलच. काही वेळा कार्यक्रम दोन दिवस लागोपाठ आल्यास टोरांटोबाहेरच्या मंडळींना मुक्काम करणे भाग पडते पुष्कळांची विशेष ओळख, नाती वा मैत्री असल्याने मुक्कामाची सोय होत असली तरी काही नवीन मराठी भाषिकांना मुक्कामाची सोय झाल्यास बरे पडेल या

जुन्या आठवणी:- स्नेहबंधच्या पहिला अंक, १९७९.
श्री. गंगाधर देशपांडे यांचे सौजन्याने.

वृत्तसार —

# नाट्यमहोत्सव :

बरेच महीने कदाचित वर्षभर सुद्धा होणार होणार म्हणून गाजत असलेला मराठी भाषिक मंडळाचा १९९१ सालचा नाट्यमहोत्सव १३ ऑक्टोबर रोजी साजरा झाला.

गेले वर्षभर पुण्याच्या प्रोग्रेसिव्ह ड्रॅमेटिक असोसिएशनच्या कलाकारांसाठी कॅनडात येण्यासाठी लागणारा व्हिसा मिळविण्याचा प्रयत्न होत होता. सप्टेंबर १९९१ च्या शेवटच्या आठवड्यात पुण्याहून व्हिसा मिळाल्याचा फोन आला आणि सर्वश्री शशी जोशी, बाळ जोशी, हेमंत कंदळगांवकर, नंदकुमार ठकार यांच्या पुढाकाराने, सर्व साथीदारांनी नाट्यमहोत्सव यशस्वी होण्यासाठी जिवापाड कष्ट केले.

सगळयात महत्वाची अडचण १५/१६ जणांची राहण्याची व्यवस्था. ती शशी जोशी, काशिनाथ धाणेकर, सुशील गेरवले, केशव गोडसे, विनय ताम्हाणे, दिलीप पत्की यांनी व त्यांच्या कुटुंबियांनी आपणहोवून स्विकारली त्यामुळे मंडळाच्या खर्चाचा बोजा बराच कमी झाला.

"मीरा-मधुरा" आणि "घेतलं शिंगावर" हे दोन नाट्यप्रयोग यशस्वीरित्या साजरे करून पुण्यातील कसलेल्या कलाकारांनी आपली प्रतिमा टोरांटोच्या रसिक नाट्यप्रेमींच्या मनावर बिंबवली.

सर्व कलाकारांचे कौतुक म्हणून १५ ऑक्टोबर रोजी मराठी भाषिक मंडळाने स्वतःच्या खर्चाने नायगरा दर्शन ची सहल आयोजीत केली होती.

२० ऑक्टोबर रोजी त्याच कलाकारांनी सादर केलेल्या विविध गुणदर्शनाच्या कार्यक्रमाने नाट्यमहोत्सवाची सांगता झाली.

९ ऑक्टोबर रोजी पुण्याहून आगमन झालेल्या सर्व कलाकारांचे २२ ऑक्टोबर रोजी गमन झाले. मागे राहील्या त्या फक्त आठवणी, पुढील नाट्यमहोत्सवापर्यंत, कदाचित १९९३!

# मराठी भाषिक मंडळ, टोरांटो INC

अनौपचारिक स्थापना : १९६८.

घटना - १९७० ; LATEST IN FORCE PUBLISHED: OCT 19, 1990

पहिली अधिकृत कार्यकारिणी : १९७१ पासून

INCORPORATION STATUS: १९८४.

CHARITABLE STATUS : १९८९.

**अध्यक्षांची नांवे :**

१९७१ : डॉ. केशव टिळक.
१९७२ : सौ. मंदाताई टिळक.
१९७३ : श्री. प्रताप रांगणेकर.
१९७४ : श्री. गंगाधर देशपांडे.
१९७५ : श्री. शरद कावळे.

१९७६ : श्री. गंगाधर देशपांडे.
१९७७ : श्री. सदानंद मंकीकर.
१९७८ : श्री. आनंद मनोहर.
१९७९ : श्री. वसंत कुलकर्णी.
१९८० : सौ. लिलाताई टेंबे.

१९८१ : श्री. आत्माराम चौधरी.
१९८२ : सौ. पुष्पा वागळे.
१९८३ : सौ. सुशिला हेबळे.
१९८४ : डॉ. काशिनाथ धाणेकर.
१९८५ : सौ. दुर्गा पाच्छापूरकर.

१९८६ : श्री. वसंत जुन्नरकर.
१९८७ : डॉ. बाळ जोशी.
१९८८ : डॉ. बाळ जोशी.
१९८९ : सौ. शालन खांडेकर.
१९९० : श्री. अजित कुकडे.

१९९१ : श्री. हेमंत कंदळगांवकर.

# रौप्यमहोत्सव-१९९३.

Fresh from Bombay by Air, everyweek. Bombay Duck, Bangada Pomphret and other favourite fish. Visit our modern store for One-Stop-Shopping. Fish, Goatmeat, and all spices. We speak your language. If we don't have it, we shall import it for you.

SpiceTown Halal Meat
3258, Lawrence Av (E)
Scarborough, (416) 438-5224

CLIP & SAVE



# BILLOW

## STEAM CARPET CLEANING SERVICE

CARPETS, RUGS & UPHOLSTERY
CAR INTERIOR

DEEP STEAM SOIL EXTRACTION
EXPERTS IN STAIN & RUST REMOVAL

• ALL WORK GUARANTEED

**HOLIDAYS SPECIAL**

• FREE HOME ESTIMATES

| Any Two Rooms | WHOLE HOUSE | Sofa & Loveseat |
|---|---|---|
| **$29.95** | **$89.95** | **$54.95** |
| Reg. Price. $48.95 | Maximum 7 Rooms | STEAM CLEANED |

**CALL TODAY FOR BOOKING**

# 347-9106

RECEIVE A FREE DEODORIZING WITH THIS AD

GREGORY LEVY

CLIP & SAVE


## मंडळाची सर्वसाधारण सभा : १९९१.

"मराठी भाषिक मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा ता.१४ डिसे. १९९१ रोजी दुपारी 2 वाजता घेण्याचे ठरविण्यात आले आहे.

कार्यक्रमपत्रिका आयत्यावेळी देण्यात येईल. सर्व सभासदांनी बहुसंख्येने हजर रहावे.

स्थळ : Oriole Community Centre
Don Mills X Sheppard.

दुपारी 3।। नंतर याच ठिकाणी मुलांसाठी Christmas पार्टी आयोजीत करण्यात आली आहे. ज्यांना भाग घ्यावयाचा असेल त्यांनी कृपया आपली नांवे. सौ. सुवर्णा कुलकर्णी, फोन 261-2178 ला द्यावीत.

## मुंबईचे महापौर टोरांटोत :

आंतरराष्ट्रीय महापौर परिषदेला उपस्थित राहण्यासाठी श्री. रावते टोरांटो येथे आले होते. त्यांच्या येथील वास्तव्याचा फायदा घेवून मराठी भाषिक मंडळाने आपल्या सभासदांसाठी भेटीगांठींचा कार्यक्रम आयोजित केला होता.

२८ ऑगस्ट १९९१ रोजी श्रीराम मुळगुंद यांचे घरी झालेल्या या कार्यक्रमात भारतातील सद्य परिस्थितीचे योग्य विवेचन महापौरांनी केले सभासदांच्या प्रश्नांना त्यांनी योग्य व समर्पक उत्तरे दिली.

## सभासदांना आवाहन :

३१ मार्च १९९२ पर्यंत सभासद वर्गणी भरणाऱ्या सर्व सभासदांना एका लॉटरीची अपूर्वाई मिळेल अशी इच्छा १९९१ च्या कार्यकारिणी तर्फे प्रदर्शित केली गेली आहे.

## आपला पत्ता बदलल्यास :

आपला पत्ता बदलल्यास कृपया मंडळाच्या कार्यकर्त्यांकडे तो पोचविण्याची काळजी घ्या आणि नंतरचे कार्यक्रमाचे वेळी त्याची योग्य नोंदणी झाली आहे का नाही याची दखल घ्या.

## जाहिरातीचे दर :

| | एक वेळा | ४ वेळा. |
|---|---|---|
| पूर्ण पान | डॉ. ८० | डॉ. 300 |
| अर्धेपान | डॉ. ४० | डॉ. १५० |
| चतकोर पान | डॉ. 20 | डॉ. ७५ |


**ACADEMY OF DEFENSIVE DRIVING**

**LEARN TO DRIVE FROM PROFESSIONALS**

1. Courses for Insurance Reductions (Costs much less than Young Drivers or high school programs)
2. Courses to sharpen your skills (i.e. Defensive driving emergency measures, under the hood training etc.)
3. Courses for standard driving

We offer services for class A B D & G Classes

PHONE - 724-0653

Ads 3 Full
1 Half
3 Quarter

**Investors Syndicate Limited**
A MEMBER COMPANY OF THE INVESTORS GROUP

SUITE 604, 304 THE EAST MALL, ISLINGTON, ONTARIO M9B 6E2 TELEPHONE: (416) 236-2564

VASANT PACHAPURKAR
Financial Planner

Call me for a confidential discussion with no obligation just to get the facts about:

- Tax Planning
- Retirement Planning
- Investment Strategy
- And More

GUARANTEED INVESTMENTS • INVESTMENT FUNDS • INSURANCE • PENSIONS • ANNUITIES • ESTATE PLANNING • RRSP's
REGISTERED RETIREMENT INCOME FUNDS • REGISTERED EDUCATION SAVINGS PLANS • INCOME DEFERRED CERTIFICATES • MORTGAGE LOANS

## "मराठा चेंबर ऑफ कॉमर्स" पुणे, यांचे स्वागत.

तारीख २९ ऑक्टोबर १९९७ रोजी वरील संस्थेचे कांही सभासद टोरांटो येथे व्यवसायविषयक चर्चा करण्यासाठी आले होते.

डॉ. भाऊसाहेब उबाळे यांनी पुढाकार घेवून मराठी भाषिक मंडळातर्फे निवडक सभासदांना आमंत्रण देवून एक चर्चासत्राचा कार्यक्रम आयोजीत केला होता.

मराठा चेंबरच्या वतीने सर्व उपस्थितांना भारतातील सद्य आर्थिक परिस्थिती समजावून सांगण्यात आली परदेशी लोकांनी विशेषत: परदेशात स्थायीक झालेल्या मराठी भाषिकांनी, भारत सरकारने सुरु केलेल्या नवीन उपक्रमांचा फायदा घ्यावा असे आवाहन केले.

त्यांनी केलेल्या आवाहनास प्रतिसाद देवून खालील संस्था स्थापन करण्यात आली आहे त्याचा फायदा मराठी समाजाने अवश्य घ्यावा. अधिक माहितीसाठी, संपर्क साधावा –

Dr. Bhausaheb Ubale,
International Investment Opportunity Centre.
6 Lancing square, Street 124,
Willowdale, Ontario, M2J, 1T5.
Phone - (416)-498-4288.
Fax - (416)-498-4290.

**Life Insurance –**
***The Right Strategy For Life***

Permanent Life insurance offers guaranteed protection for your entire life. With a premium offset policy, you can reach the point where your policy pays for itself. Call me today to find out more about the advantages of investing in permanent life insurance.

**Prabhakar Iyer**
*Representative*

Bus: 479-3800
Res: 287-8285

**SunLife**
*See the Difference the Sun Makes!*

# मराठी भाषिक मंडळ, टोरांटो इन्क०

## वार्षिक सर्वसाधारण सभा

## १९९१

डिसेंबर १४, १९९१ रोजी मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा व पुढील वर्षाच्या कार्यकारिणीची निवडणूक होईल. यासाठी खालील लोकांची निवडणूक समिती स्थापन करण्यात आली आहे.

| | | |
|---|---|---|
| सद्यकार्यकारिणीतून | १) श्री. नंदकुमार ठकार. | (416) 452-1992 |
| " | २) सौ. सुवर्णा कुलकर्णी. | (416) 261-2178 |
| चेअरमन | ३) सौ. सुनंदा तुमणे. | (416) 828-2211 |
| सभासद | ४) श्री. शरद कावळे. | (416) 497-8525 |
| " | ५) श्री. अशोक भंसाळी. | (416) 819-1988 |

घटनेप्रमाणे जो कोणी मंडळाचा किमान एक महिना सभासद आहे त्याला या निवडणुकीसाठी उभे राहता येईल. ज्यांना १९९२ -च्या कार्यकारिणीवर काम करण्याची इच्छा असेल त्यांनी कृपया वरील कोणत्याही सभासदांकडे तसे कळवावे. किमान दोन सभासदांचा अशा उमेदवाराला पाठिंबा असायला हवा.

घटनेत वा पोट कलमांत (BY-LAW) सभासदांना कांही बदल सुचवायचे असतील तर त्यांनी मंडळाकडे १ डिसेंबर १९९१ चे आंत लेखी पाठवावेत. ह्या सूचनेला मंडळाच्या कमीत कमी ५ सभासदांचा लेखी पाठींबा असणे आवश्यक आहे.

**निवडणूक समिती प्रमुखांचा पत्ता :**

Mrs. SUNANDA TUMNE
3501 BURGESS CRESCENT
MISSISSAUGA, ONTARIO
L5L 4Y7.

**मंडळाच्या अध्यक्षांचा पत्ता :**

Shri. HEMANT KANDALGAONKAR
24, MARBURY PLACE
BRAMPTON, ONTARIO,
L6S 3A9.

दिवाळी कार्यक्रम

तारीख १६ नोव्हेंबर १९९१

नाटक : शांतता कोर्ट चालू आहे०

सादरकर्ते - न्यूयॉर्क महाराष्ट्र मंडळ

दुपारी ३।। वाजता

सहभोजन - सायंकाळी ७ वाजता०

आपले स्वागत असो०

कार्यकारिणी १९९१.



## मराठी आडनावांची गंमत.

खाली कांही मजेशीर पण त्याना अर्थ असलेली आडनांवे लिहीली आहेत. ती उलटसुलट अक्षरात एकाच ओळीत लिहीली आहेत. आपण प्रत्येक ओळीतून बरोबर अक्षरे निवडून चार चार आड नावे प्रत्येक ओळीतून तयार करा

आडनावे

1) ओले ळेक कापड केळे ( वस्तु व रंग)
2) शहाळे बावणे भोटे तापळे ( स्वभाव दर्शन)
3) कारे बेणे हेवा डेटे भिक ( व्यंगार्थ)
४) मेंड वडे पळ काळे मुकडे ( भाज्यां)
५) वाह्रे कोवळे मुंघ कागी ( प्राणी)

सौ. सुधा सडेकर.

## मराठी शाळा.

मराठी भाषिक मंडळातर्फे नॉर्थ यॉर्क, टोरांटो येथे सध्या दोन क्लासेस के.जी व ज्युनिअर असे चालत असून प्रत्येकी 20 विद्यार्थी लाभ घेत आहेत मिसिसागामध्ये एक क्लास चालला असून तेथील विद्यार्थी संख्या २५ आहे.

दिवाळीच्या निमित्ताने भेटकार्ड व आकाशदिवा तयार करण्याची स्पर्धा मराठी शाळेच्या विद्यार्थी-वर्गासाठी ठेवण्यात आली आहे. मंडळाच्या ता.१६ नोव्हेंबर १९९१ रोजी होणाऱ्या कार्यक्रमाचे दिवशी मुलांच्या कलाकृतींचे प्रदर्शन मांडण्यात येईल.

## साहित्य व संगित संमेलन : १९९२.

मार्च/एप्रिल १९९२ मध्ये वरील दोन्ही कार्यक्रमात भाग घेण्याची इच्छा असलेल्यांनी तयारीस सुरवात करावी आणि १९९२ च्या कार्यकारिणीशी संपर्क साधावा.

## फेस्टीवल ऑफ हार्टस्.

सिटी ऑफ नॉर्थ यॉर्कच्या फेस्टीवल ऑफ हार्टस् च्या कार्यक्रमामध्ये ता.६ ऑक्टोबर १९९१ रोजी मराठी भाषिक मंडळातर्फे खालील कलाकारांनी टिपरी नृत्य, कथ्थक नृत्य व रेकॉर्ड नृत्य सादर केले.

कु.संगीता व संपदा कुकडे, कु.मोनीका पत्की, कु.अमीता चौधरी, कु.वर्षा व मनिषा ठाकूर, कु.अंजना सचमानानी, सौ.अनु अम्बुर्ले.

सुत्रधार सौ.सरिता कुकडे यांचे सहित वरील सर्व कलाकारांचे अभिनंदन!

## नॉर्थ अमेरीकेतील महाराष्ट्रीय मंडळास आवाहन

मराठी भाषिक मंडळ, टोरांटोच्या कार्यकारिणीची अशी इच्छा आहे कीं नॉर्थ अमेरीकेतील महाराष्ट्र मंडळाच्या अध्यक्षांनी आपल्या भागातील हौशी कलाकारांची नांवे व ते सादर करीत असलेले कार्यक्रम याविषयीची माहिती खालील पत्त्यावर पाठवावी.

Shri. Hemant Kandalgaonkar.
President,
24, Marbury Place,
Brampton, Ontario,
L6S 3A9, CANADA.

अशा प्रकारची माहिती एकत्रित केल्याने वेळोवेळी कार्यक्रम करताना प्रथम, यादीतील लोकांना प्राधान्याने विचारणा केली जाईल. कार्यक्रम ठरविण्याचे काम सोपे होईल.

याच पानावरील गंमतीची उत्तरे - ५)वाघ, कोल्हे, कावळे, मुंगी 3)काणे, बहरे, वावडे, भिडे 2)शहाणे, बावळे, भोळे, तापटे ४) मेंडे, पडवळ, काकडे, मुळे 1) काळे पडके ओकळे

SECURITY INFORMATION SYSTEMS

RCA

# An Alarming Message

## *about your home security...*
## *Do you know ????*

- In Canada, every **TWO** minutes a home is broken into, 1 in 5 homes is broken into every year.
- Burglars strike where it's easy, and they know that very few of Canadians have invested in a Security System for their homes.
- Once your home is broken into, probably it'll be broken into again.
- At least once in lifetime, every Canadian adult and child will experience a serious fire requiring assistance from fire department.
- Insurance companies now grant discounts to homeowners whose homes are electrically protected against fire and theft.
- A monitored alarm system monitors your home 24 hours a day, 7 days a week, regardless of whether you are at work, on vacation or at home , sleeping.
- **SIS** provides security to residential and commercial premises such as The Skydome, Metro Toronto Police Headquarter and banks.

*A monitored system can protect you and your family against fire, burglary and assault.*

**CALL NOW FOR FREE, NO-OBLIGATION SECURITY SURVEY OF YOUR HOME**



मराठी भाषिक मंडळ टोरांटो - कॅनडा....